नि.दि.दावा क्र. ०७/२०१९
फकीरबा वि. शेषराव व इतर
**CNR No.MHJN090000482019**

## नि.क्र.२० वरील आदेश

१) प्रतिवादीविरुध्द झालेले ''लेखी जबाब नाही'' हे आदेश रद्द करुन प्रतिवादी यांचा लेखी जबाब स्वीकारण्याच्या मागणीसाठी अर्ज दाखल आहे.

२) प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.२ हा आजारी पडल्याने विहीत तारखेला लेखी जबाब तयार असूनही त्याची स्वाक्षरी घेता आली नाही. त्यामुळे, लेखी जबाब वेळेत अभिलेखावर सादर करता आलेला नाही. अर्जातील कारण पाहता अर्ज मंजूर करणेत यावा.

३) वादी यांचे म्हणणेनुसार, प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे, जास्तीत जास्त दंडावर अर्ज नामंजूर करावा.

४) उभय पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. घोषणेच्या व मनाई हुकूमाच्या मागणीसाठी अर्ज दाखल आहे. उभय पक्षाचे महत्वपूर्ण आणि मौल्यवान अधिकार वादमिळकतीमध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे, दाव्याचा निकाल गुणवत्तेवर देण्यासाठी अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती भा.का. पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
बदनापूर.

दि.२४.०७.२०१९.